महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं-२०२५/पाच/मार्गदर्शक सूचना/1331 दिनांक:- 11 DEC 2025

## परिपत्रक

**विषय:- उत्तरपत्रिका तपासण्याकरीता मार्गदर्शक सूचना.**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या प्रथम सत्राच्या परीक्षा दि. ०३.१२.२०२५ ते २०.१२.२०२५ या कालावधीत आयोजित केलेले आहेत. थेअरी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्याकरीता मंडळाने मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत. मार्गदर्शक सूचना सोबत जोडले आहे.

कला परिसंस्थांचे कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, थेअरी विषयांच्या उत्तरपत्रिका तपासणाऱ्या अध्यापक यांना सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणेबाबत कळवावे.

(स्मिता किंकळे),
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रति,

१. कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर व छत्रपती संभाजीनगर
३. प्राचार्य, शासनमान्य सर्व कला परिसंस्था.

प्रत-

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई
२. निवड नस्ती.

# थेअरी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासण्याकरीता मार्गदर्शक सूचना

थेअरी विषयाच्या उत्तरपत्रिका तपासतांना खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

- उत्तरपत्रिका तपासतांना गोपनियता बाळगावी.
- उत्तरपत्रिका तपासणी करतांना कोणत्याही प्रकारचे चूक होता कामा नये.
- उत्तरपत्रिका तपासणी करतांना लाल शाईचा बॉल पॉईंट पेन वापरावा.
- उत्तरपत्रिकेच्या डाव्या बाजूला गुण समासामध्ये द्यावेत.
- उत्तरपत्रिकेवर चूक × किंवा बरोबर ✓अथवा खुणा लाल शाईनेच कराव्यात.
- उत्तरपत्रिकेत विद्यार्थ्याने लिहलेला मजकूर वाचूनच त्यानुसार गुण प्रदान करावेत.
- गुणामध्ये खाडाखोड करू नये.
- विद्यार्थ्याला ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असतील, अश्या विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका पुनश्च: तपासून गुण प्रदान करावेत.
- विद्यार्थ्याला ७० पैकी २५/२६/२७ गुण मिळाले असतील तर क्रिटिकल केस (Critical Case) समजून दिलेले गुण बरोबर आहेत का? याची पुन्हा खात्री करावी.
- गुणांची बेरीज पुनश्च: तपसावी व बरोबर असल्याची खात्री करूनच दिनांकीत स्वाक्षरी करावी.
- अध्यापकांनी Model Answer/Marking Scheme तयार करूनच उत्तरपत्रिका तपासाव्यात.
- विद्यार्थ्यांची उत्तरे इंग्रजी/मराठी/हिंदीत असतील. त्या त्या भाषेत उत्तरे समजून गुण प्रदान करावेत.
- विद्यार्थ्याला प्राप्त झालेले गुण Software Module मध्ये अचूक Enter करावेत.
- विषयाच्या ५% उत्तरपत्रिकेचे Moderation दुसऱ्या एखाद्या अध्यापकाकडून करावे.
- अध्यापकांनी उत्तरपत्रिका तपासणी करतांना गैरप्रकार झाल्याचे/उत्तरपत्रिका फाटलेली असल्यास/सामूहीक कॉपी असल्यास/उत्तरपत्रिकेतील पृष्ठ गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत मुल्यांकन केंद्र प्रमुखामार्फत मंडळास लेखी कळवावे.
- अध्यापकांनी प्रती दिवस कमीत कमी ६० उत्तरपत्रिका तपासणे आवश्यक आहे.
- प्रत्येक प्रश्नांच्या उप-प्रश्नाला अपुर्णांकात गुण देता येतील. परंतु प्रत्येक प्रश्नांच्या सर्व उत्तरांचे एकूण गुण पुर्णांकात असावेत. तसेच सर्व प्रश्नांच्या उत्तरांचे एकूण गुण सुध्दा पुर्णांकात असावेत.
- उत्तरपत्रिकेत कोरी पाने असल्यास परिक्षकांनी प्रत्येक कोऱ्या पानावर लाल पेन ने उभी रेघ मारावी.
- विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकेत लिहिलेली सर्व उत्तरे तपासली आहेत, याची खात्री करावी.
- उत्तरपत्रिका मंडळाने विहित केलेल्या कालावधीतच तपासाव्यात.

------------XXX-----------

Maharashtra State Board of Art Education * Mumbai *